११५

जा. क्र. माध्य-३/१४/नूतनीकरण/पुवि/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १. यांचे कार्यालय.
दिनांक :- ७.१०.९६

11 OCT 1996

प्रति

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद,
पुणे/सोलापूर.

विषय :- माध्यमिक शाळांच्या परवानगी आदेशाचे नूतनीकरण.

संदर्भ :- शासन प. क्र. एसएसएन-१०९६/७१८८/माशि-१
दिनांक १३.८.९६

--------x--------

उपरोक्त विषयान्वये आपण सादर केलेला प्रस्ताव व त्या अनुषंगाने या कार्यालयाने शासनास सादर केलेली माहिती विचारात घेवून माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेल्या, परंतु परवानगीचे आदेश उशिरा मिळाल्यामुळे किंवा अन्य कारणास्तव परवानगीच्या वर्षापासून माध्यमिक शाळा सुरु न करु शकलेल्या खालील संस्थांच्या परवानगी आदेशाचे नूतनीकरण करण्यास संदर्भीय आदेशान्वये शासनाने परवानगी दिलेली आहे -

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | परवानगीचे वर्ष व माध्यम. | शासन आदेश क्रमांक व दिनांक |
| --- | --- | --- | --- | --- |
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| [१] | डी. सी. एम. सोसायटी, पुणे. | वडगांव शिंदे, ता. हवेली, जि. पुणे. | १९९०-९१ मराठी. | एसएसएन-१०९०/ २४६०/माशि-१ दि. २७.११.९० |
| [२] | जय शिवराय प्रतिष्ठान, पौड, पुणे. | माळेगांव माळेजी, ता. मुळशी जि. पुणे. | १९९५-९६ मराठी | एसएसएन-१०९५/ ५८००/माशि-१ दि. १६.१०.९६ |
| [३] | -"- | हिंगणे, ता. मुळशी, जि. पुणे. | ९५-९६ मराठी | -"- |
| [४] | पुण्यश्लोक अहिल्यादेवी क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ. | दक्षिण सोलापूर तांदूळवाडी | ९५-९६ मराठी | एसएसएन-१०९५/ ५८००/माशि-१ दि. २५.१०.९६ |

सदर नूतनीकरण उपरोक्त संस्थांच्या मूळ शाळा परवानगीच्या शासन आदेशात नमूद

[कृ. मा. पहावे.

केलेल्या विहित अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर देण्यात येत आहे. तरी याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी व तसे संबंधित संस्थांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.

स्थळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे. १

प्रत माहितीस्तव :-

१] मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२. यांना सविनय सादर.

२] मा. शिक्षण संचालक, म.रा. पुणे.१. यांना सविनय सादर.

३] संबंधित संस्था [४ प्रती]